bluebytes
news that matters

लोकमत

Monday, March 29, 2010

**National Survey results reveal ineffectiveness of current pictorial warnings on tobacco products**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Supplement: Hello Mumbai, Journalist: Bureau, Page No: 2, Location: Top-Center, Width(cms): 20, Height(cms): 9, Size(sq.cms): 180

# तंबाखू उत्पादनांवरील नवे चित्रमय इशारे अधिक प्रभावी

## हिलीस सेखसारिया संस्थेचे मत

मुंबई, दि. २८ (प्रतिनिधी) - तंबाखू उत्पादनांवर येत्या १ जूनपासून नवे चित्रमय इशारे लावण्याच्या केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या निर्णयाचे स्वागत करतानाच हे इशारे सध्याच्या इशाऱ्यांपेक्षा अधिक प्रभावी ठरतील, असे मत हिलीस सेखसारिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ या तंबाखूनिरोधक काम करणाऱ्या संस्थेने व्यक्त केले आहे.

भारतीय तंबाखू नियंत्रण कायद्यातील पॅकिंग व लेबलिंग नियमांतर्गत ३१ मार्च २००९ रोजी तंबाखूजन्य उत्पादनांवर असे इशारे द्यायला सुरुवात झाली. त्यानंतर आता तब्बल एक वर्षानंतर १ जूनपासून त्याचा पुन्हा आरंभ करण्यात येणार आहे.

याबाबत बोलताना हिलीस सेखसारिया संस्थेचे संचालक डॉ. पी.सी. गुप्ता म्हणाले की, नवे चित्रमय इशारे अत्यंत प्रभावी असून यामुळे तंबाखूचे दुष्परिणाम लोकांपर्यंत अधिक चांगल्या प्रकारे पोहोचू शकतील.

सध्याच्या इशाऱ्यांचा तंबाखूचा वापर करणाऱ्यांवर होणारा परिणाम तपासण्यासाठी हिलीसच्या वतीने नुकतेच आठ राज्यांतील ग्रामीण व शहरी भागात एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात १८ ते ५० या वयोगटातील तंबाखूचा वापर करणाऱ्या आणि न करणाऱ्या १०२० लोकांचा समावेश होता. या लोकांपैकी फक्त निम्म्या लोकांना हे इशारे वाचता किंवा पाहता आले. तसेच त्यांच्यातील एक तृतीयांश लोकांनीच हे इशारे वाचल्यावर तंबाखू सोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे सध्याचे इशारे किती प्रभावहीन ठरत आहेत, हे स्पष्ट होत असल्याचे गुप्ता यांनी सांगितले.

१ जूनपासून सिगारेट तसेच इतर तंबाखू उत्पादनांवर कॅन्सरग्रस्त तोंडाचे चित्र लावण्यात येणार आहे. यामुळे लोकांना तंबाखूच्या भयानक परिणामांची जाणीव होईल. कारण, इतर देशांमध्ये तंबाखू उत्पादनांवर चित्रित इशारे अत्यंत प्रभावी ठरत आहेत. ब्राझील आणि मॉरिशस या देशांमध्ये सिगारेटच्या पाकिटांवर असलेले कॅन्सरग्रस्त तोंड अत्यंत प्रभावी ठरले आहे. अशा चित्रांमुळे या देशांतील धूम्रपानाचे प्रमाणही कमी झाले असून तंबाखूजन्य उत्पादनांच्या विक्रीत मोठी घट झाली आहे. तसेच मोठ्या चित्रित इशाऱ्यांमुळे तंबाखूच्या धोक्यांबाबत जागरूकता निर्माण होत असून तंबाखू सोडणाऱ्यांच्या संख्येतही वाढ होत असल्याचे जगभरातील अभ्यासातून स्पष्ट झाल्याचे डॉ. गुप्ता यांनी सांगितले.